## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १८ (प्रतीनिधी) :- पारंपारिक लोककला जीवंत ठेवण्यासाठी पोवाडा,भारुड,भजन या भारतीय लोककलेचे समृध्द सादरीकरण तसेच लोकवाद्यांमध्ये ढोलकी, हलगी, संबळ,पखवाज, यांचा नादमय वापर करत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी लोकसंस्कृतीचे अनोखे दर्शन घडवीले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि राष्ट्रीय सेवा योजना कक्ष उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "**उत्कर्ष**" या राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेचा सोमवारी दुसरा दिवस होता. सकाळी नऊ वाजता पोवडा, भारूड आणि भजन या भारतीय लोककला स्पर्धेला प्रारंभ झाला. राज्यातील पंधरा विद्यापीठांच्या संघांनी यात भाग घेतला आहे. वीरांच्या प्राराक्रमांची आणि विद्वानांच्या बुध्दीमत्तेचे सामर्थ्य सांगतांना या पोवाड्यांना आताचे सामाजिक संदर्भ जोडून स्फूर्ती आणली गेली. भारुडातून नितीमुल्ये आणि आताचे सदंर्भ यावर समर्पक शब्दात मत व्यक्त केले. भजनाद्वारे भक्तीपुर्ण वातावरण निर्मिती केली.

त्यानंतरच्या सत्रात भारतीय लोकवाद्य स्पर्धा झाली. ढोलकी, बासरी, हलगी, खंजीरी, नाल, डफ, मृदंग, पखवाज, संबळ, दिमडी, ढोल, तबला, धनगरी ढोल, हार्मोनिअम, तुणतुणे या वाद्यांचा समृध्द वापर करून नादमय आणि तालमय असे वातावरण दीक्षांत सभागृहात निर्माण केले. काही कलावंतांनी एकाचवेळी पाच ते सहा वाद्यांचा वापर प्रभावीपणे केला. बोटांचा हुकमी वापर आणि रियाज याचे दर्शन यातून घडत होते. ढोलकीचा बाज, लावणीची नाल, तुणतुणाचा गुंजारव, घुंगरांचा नाद आणि मृदंगाचा भक्तिभाव याचे एकत्रित सामायिक प्रदर्शन रसिकांना सुखावणारे होते. एकीकडे पाश्चात्य वाद्य शिकण्याकडे तरूणांचा ओढा असल्याचे म्हटले जात असतांना रासेयोच्या कलावंतांनी समृध्द अशी लोकसंस्कृती जपण्यासाठी ही पिढी तयार असल्याचा संदेश यावेळी दिला.

दुपारनंतरच्या सत्रात संकल्पना नृत्य स्पर्धा झाली. संकल्पनानृत्याच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या संकल्पनेवर आधारीत स्वच्छता, पर्यावरण, धाडस, जनजागृती, चंद्रयान, स्त्री सुरक्षा, सुदृढ भारत हे विषय अंत्यत ताकदीने हाताळतांना लावणी, भरतनाट्यम, कत्थक, या नृत्याचा आधार घेण्यात आला. यावेळी सिनेट सदस्य् केदारनाथ कवडीवाले, सुरेखा पाटील,रा.से.यो. संचालक डॉ.सचिन नांद्रे उपस्थित होते. यावेळी दीक्षांत सभागृहात भित्ती पत्रके व कार्यप्रसिध्दी अहवाल प्रदर्शन मांडण्यात आले होते.

सायंकाळच्या सत्रात निबंध स्पर्धा घेण्यात आली. निबंधासाठी विकसीत भारत समृध्द भारत, राष्ट्रविकास:युवकांची जबाबदारी, आजच्या युवापिढीपुढील आव्हाने हे विषय देण्यात आले होते. उद्या काव्यवाचन, समुह गीत, भित्ती चित्र घोषवाक्य, वक्तृत्व सर्धा होणार आहेत.

............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १८ मार्च, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

# जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १८ (प्रतीनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा आंतरविद्याशाखीय प्रशाळेअंतर्गत शिक्षणशास्त्र विभाग आणि विद्यार्थी कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आदिवासी विद्यार्थी आत्मविश्वास व प्रेरणा कार्यशाळेचा समारोप शनिवार दि. १६ मार्च रोजी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्या उपस्थितीत झाला.

या कार्यशाळेत तीन जिल्हयातील १५० आदिवासी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. समारोपाच्या दिवशी नाट्यकर्मी विनोद ढगे यांनी शिक्षणाचे महत्व आणि व्यसनमुक्ती या विषयावर पथनाट्याद्वारे प्रबोधन केले. त्यानंतरच्या सत्रात सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. समारोप प्रसंगी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, विद्यार्थी विकास विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. संजय पाटील, प्रशाळेच्या संचालक डॉ. मनीषा इंदाणी, समन्वयक डॉ. संतोष खिराडे उपस्थित होते. सुत्रसंचालन प्रणाली सोनवणे यांनी केले, डॉ. स्वाती तायडे यांनी आभार मानले.

**बातमी क्र. २**

जळगाव, दि. १८ (प्रतीनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र प्रशाळे अंतर्गत असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स विभागामार्फत पदवीस्तरावरील इलेक्टॉनिक्स विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

दि. १६ मार्च रोजी झालेल्या या कार्यशाळेत १३२ विद्यार्थी व १० शिक्षक उपस्थित होते. रिसेंट ट्रेंडस् इन एम्बिडेड सिस्टीम या विषयावर झालेल्या या कार्यशाळेत जळगाव, धुळे व नंदुरबार तसेच मालेगाव, खामगाव, शेगाव येथील बीएस्सी चे विद्यार्थी आणि इलेक्टॉनिक्स इंजिनिअरींगचे विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.ए.एम. महाजन होते. प्रशाळेचे संचालक प्रा.जयदीप साळी, इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ. डी.जे. शिराळे, डॉ. जसपाल बंगे, डॉ. राहुल साळुंके, एम.एस. नेतकर उपस्थित होते. नांदेड येथील डॉ. योगेश नकाशे यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. उल्हास सोनवणे यांनी केले, वैभव बोरोकर यांनी आभार मानले. दुपारच्या सत्रात क्लास क्लिन रूम दाखविण्यात आली व प्रशिक्षणही देण्यात आले.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १८ मार्च, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी